# रे. दि. मु. क्रमांक १४३/२०१३ मधील नि.क्र. २३ खालील आदेश.
## दादामिया कडेकर व इतर -विरुध्द- उमेश मेढेकर व इतर
## आदेश पारित दिनांक २१.०२.२०२३

---

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे प्रस्तूत दाव्यात कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला उशीर माफ करणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जासोबत सुनंदा सिताराम बर्वे यांचे सत्यप्रतिज्ञापत्र निशाणी क्र. २४ वर दाखल केले आहे.

०२. प्रस्तूत अर्जात प्रतिवादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ हे स्वतः दिनांक ०८.०९.२०२२ रोजी न्यायालयात हजर झाले असून प्रस्तूत दाव्याच्या कैफियतीसाठी आवश्यक असणारी माहिती व कागदपत्रे उपलब्ध होऊ शकलेली नाहीत. त्यामुळे या प्रतिवादींतर्फे वादींच्या दाव्यास कैफियत दाखल करणेस उशीर झालेला आहे. त्यामुळे सदर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांची कैफियत अभिलेखावर घेणेस झालेला उशीर माफ होवून मिळावा, ही विनंती केली आहे.

०३. सदरकामी, वादींतर्फे असे म्हणणे दाखल की, प्रतिवादी यांनी दिलेला अर्ज योग्य व कायदेशीर नाही. तो फेटाळण्यात यावा. अर्जात दिलेले कारण योग्य व संयुक्तीक नाही. प्रतिवादी क्र. १ व २ यांना पुरेशी संधी दिलेली होती. अर्ज मंजूर करणेचा झालेस सदर प्रतिवादी यांना कॉस्ट करून अर्ज मंजूर करणेत यावा.

०४. प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादींना त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करण्यास विलंब झाला. सदरील दाव्याचा गुणदोषावर निकाल देणेकरिता प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर असणे आवश्यक आहे. प्रतिवादींनी विहित वेळेत त्यांची कैफियत अभिलेखावर घेतले नसल्याचे हे कारण नमूद केले आहे की, दाव्याचे कामी आवश्यक ती कागदपत्रे कैफियत देणेसाठी उपलब्ध झाली नसलेने प्रतिवादी क्र. १ व २ यांना मे. कोर्टात म्हणणे दाखल करणेस उशीर झाला आहे.

०५. सदरकामी, प्रतिवादी क्र. १ व २ यांची कैफियत अभिलेखावर घेतल्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल गुणदोषावर देणेकरिता मदत होणार आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचा अंतिम निकाल होणेकरिता प्रतिवादी क्र. १ व २ यांची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. तरी खालील आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. १ व २ यांचा निशाणी क्र. २३ चा अर्ज मंजूर करणेत येतो. |
| २. | प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांची कैफियत मुदतीत अभिलेखावर घेण्यास झालेला उशीर माफ करण्यात येतो. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

(अ. क. दामटे)
दिनांकः- २१.०२.२०२३ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.